**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक १०४ वा ● शनिवार ३१ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 104 | Date : 31/08/2024 | blow Saturday | Page 4 Price 4

## वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचे आर्थिक चित्र बदलणार : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

### वाढवण बंदराचा पायाभरणी व १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पालघर : देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासात मच्छिमार बांधवांचे मोठे योगदान आहे. वाढवण बंदर जगातील सर्वात खोल व मोठ्या बंदरांपैकी एक महत्त्वपूर्ण बंदर होणार आहे. या प्रकल्पामुळे या परिसराचे आर्थिक चित्र बदलणार आहे. आता हा परिसर रेल्वे व महामार्गांशीही जोडला जाणार असून यामुळे या परिसरात नवनवीन व्यापार सुरू होतील. या बंदराचा लाभ महाराष्ट्राबरोबरच या भागातील स्थानिकांना व त्यांच्या पुढील पिढ्यांना होणार आहे, असे प्रतिपादन देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. सुमारे ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ तसेच १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्प व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पालघरमधील सिडको मैदानात आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय बंदर विकास, जहाज व जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन राज्यमंत्री जॉर्ज कुरियन, केंद्रीय बंदर विकास, जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, बंदर विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार श्रीनिवास वनगा, आमदार निरंजन डावखरे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेश वाघ, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी । पान २ वर



## पाच बँकांकडून शून्य टक्के पीककर्ज वाटप, दहा व्यवस्थापकांवर गुन्हे दाखल; आणखी २५ रडारवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

धाराशिव : यंदाच्या खरीप हंगामात अर्ज करूनही शेतकर्यांना पीककर्ज वाटप न करता त्यांना अडचणीत आणणार्या बँकांना राज्य सरकारने दणका दिला आहे. धाराशिव शहरातील दहा बँकांच्या व्यवस्थापकांवर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. आणखी २५ शाखा व्यवस्थापक रडारवर आहेत. पाच बँकांकडून शून्य टक्के कर्जवाटप करण्यात आल्याची गंभीर बाब समोर आल्यानंतर पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी जिल्हा प्रशासनाला आदेश दिल्यानंतर १० बँकांच्या व्यवस्थापकांवर कारवाई करण्यात आली.राज्य सरकारने आदेश देऊन देखील शेतकर्यांना पीककर्ज वाटप न करण्यार्या मुजोर बँकांना सरकारने दणका दिला आहे. १० बँकेच्या शाखाधिकारी अर्थात मॅनेजरवर पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली आहे. शेतकर्यांना कर्ज मिळत नसल्याने व बँका कर्ज वाटप करीत नसल्याने पालकमंत्री डॉ. सावंत यांनी आक्रमक भूमिका घेत गुन्हा नोंद करण्याचे आदेश मागील महिन्यात दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी पीककर्ज वाटपाची आकडेवारी घेऊन गुन्हा नोंद करण्याची कारवाई केली आहे. सहाय्यक निबंधक आशाबाई कांबळे यांच्या तक्रारीनुसार भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ (जुने १८८ कलम) लोकसेवकाच्या आदेशाचे पालन न करणे याप्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

## भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण; जीडीपी अवघा ६.७ टक्क्यांवर, गेल्या पाच तिमाहीतला सर्वात कमी दर

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : भारताचा सकल देशांतर्गत उत्पादनाचा म्हणजेच जीडीपी दर गेल्या पाच तिमाहींमध्ये सर्वात कमी आहे. एप्रिल ते जून २०२४ या तिमाहीतला जीडीपीचा दर ६.७ टक्के इतका घसरला आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत भारताच्या जीडीपीचा दर ८.२ टक्के इतका होता. शासकीय आकडेवारीनुसार देशाचा जीडीपी घसरण्याचं प्रमुख कारण म्हणजे कृषी क्षेत्राची खराब कामगिरी. गेल्या काही महिन्यांमध्ये देशभरातील बहुतांश भागात कृषी क्षेताला मोठा फटका बसला आहे. कृषी उत्पादन इतकं कमी झालं की त्याचा थेट जीडीपीवर परिणाम झाला आहे. एकीकडे केंद्र सरकारकडून सांगितलं जातंय की भारत ही जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. दुसऱ्या बाजूला भारताच्या जीडीपीत सातत्याने घसरण पाहायला मिळत आहे.

## बांगलादेशी घुसखोरांना थोपवणार; भाजपा प्रवेशानंतर चंपाई सोरेन यांचं पहिलं आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

झारखंड : झारखंड मुक्ती मोर्चाचे माजी वरिष्ठ नेते आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी आज (३० ऑगस्ट) भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. झारखंडची राजधानी रांची येथील



शहीद मैदानात भाजपाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान व आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या प्रमुख उपस्थितीत चंपाई सोरेन यांनी भाजपात प्रवेश केला. या कार्यक्रमाला झारखंड भाजपाचे संघठन प्रभारी लक्ष्मीकांत वाजपाई, भाजपा प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी, माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा यांच्यासह पक्षातील अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते.

दरम्यान, पक्षप्रवेशानंतर चंपाई सोरेन यांनी त्यांच्या आगामी योजनेवर भाष्य केलं. पक्षप्रवेश सोहळ्यानंतर सोरेन यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी आगामी योजनेबाबत विचारलं. तेव्हा ते म्हणाले, मी आधीच सांगितलं की आमचं संपूर्ण लक्ष झारखंडच्या विकासावर असेल. राज्यात बांगलादेशी लोकांची होणारी घुसखोरी आम्ही निश्र्चितपणे थोबवणार. दरम्यान, सोरेन यांना विचारण्यात आलं की भाजपामध्ये तुम्हाला कोणती जबाबदारी दिली जाणार आहे? त्यावर सोरेन म्हणाले, तो निर्णय पक्ष घेईल. पक्ष मला जी जबाबदारी सोपवेल ते काम मी ईमानदारीने करेन.

## आसाम सरकारचा निर्णय; नमाज पठणासाठी दर शुक्रवारी मिळणारी २ तासांची सुट्टी बंद

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**



आसाम : गेल्या काही दिवसांपासून आसाम सरकारने विविध निर्णय घेण्याचा धडाका लावला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी आज (३० ऑगस्ट) आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. आसाममधील मुस्लिम आमदारांना दर शुक्रवारी मिळणाऱ्या दोन तासांच्या नमाज अदा करण्यासंदर्भातील सुट्टीच्या नियमांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे आता मुस्लिम आमदारांना नमाज अदा करण्यासाठी देण्यात येणारी दोन तासांची सुट्टी रद्द करण्यात आली आहे. या निर्णयानुसार, यापुढे ही दोन तासांची सुट्टी मिळणार नाही. आसाम विधानसभेची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि राज्यावरील वसाहतीचे ओझे दूर करण्याच्या उद्देशाने, जुम्मासाठी दर शुक्रवारी सभागृहाचे कामकाज २ तासांसाठी तहकूब करण्याचा नियम रद्द करण्यात आला आहे. ही प्रथा १९३७ मध्ये मुस्लिम लीगच्या सय्यद सादुल्ला यांनी सुरू केली होती. भारतातील प्राचीन धर्मनिरपेक्ष मूल्ये जपण्याच्या या प्रयत्नासाठी आसाम विधानसभेच्या अध्यक्षांचे आणि सन्माननीय सदस्यांचे आभार, असं मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये म्हटलं आहे.दरम्यान, आसामच्या विधानसभेमध्ये दर शुक्रवारी नमाज अदा करण्यासाठी दुपारी २ तासांची तासांची सुट्टी देण्यात येत होती. ही पंरपरा ब्रिटिशकालीन परंपरा होती, असं सांगितलं जातं. या दोन तासांच्या वेळेत दर शुक्रवारी मुस्लिम आमदार नमाज अदा करत होते. मात्र, आसाम सरकारने आज घेतलेल्या या निर्णयानंतर यापुढे ही सुट्टी मिळणार नाही.

आसाम सरकारने मंगळवारी (२७ ऑगस्ट) राज्यात मुस्लिम विवाह आणि घटस्फोटांची नोंदणी अनिवार्य करण्यासंदर्भातील विधेयक विधानसभेत सादर केलं. आसाम सरकारने हे विधेयक विधानसभेत सादर केल्यानंतर विरोधी पक्षाने यावर आक्षेप घेतला. मात्र, तरीही सरकारने हे विधेयक सभागृहात सादर केलं. या विधेयकानुसार मुस्लिमांना आता विवाह आणि घटस्फोटाची नोंदणी अनिवार्य असणार आहे. त्यानंतर मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा म्हणाले होते की, आसाम सरकारने आणलेल्या या मुस्लिम विवाह आणि घटस्फोटांची नोंदणी अनिवार्य करण्यासंदर्भातील नव्या विधेयकामुळे या मुस्लिम निकाह पद्धतीत बदल होणार नाहीत. मात्र, फक्त नोंदणीमध्ये बदल केले जातील. तसेच प्रशासनाच्या निबंधक कार्यालयात विवाह आणि घटस्फोटाची नोंदणी केली जाईल.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विभागीय अधिवेशन पाचोरा येथे उत्सवात संपन्न

### * स्वर्गीय प्रमोद सोनवणे यांच्या कुटुंबीयांना राज्य पत्रकार संघाची ११ लाखाची मदत *

### पाचोरा टीमचे कार्य कौतुकास्पद्य १००० पत्रकारांना विमा संरक्षण देऊन केला विशेष सन्मान

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

जळगाव/प्रतिनिधी : राज्य पत्रकार संघाच्या वतीने जी संवाद यात्रा काढली त्या संवाद यात्रेमध्ये युती सरकारकडे जेवढ्या मागण्या केल्या आहेत तेवढ्या मागण्या पूर्ण करण्यासाठी मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे तातडीने बैठक लावून यासाठी पाठपुरावा करणार असल्याची मत भडगाव पाचोरा विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार किशोर आप्पा पाटील यांनी काल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या खानदेशी विभागीय अधिवेशनात व्यक्त केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्य पत्रकार संघाचे सरचिती डॉक्टर विश्र्वास आरोटे होते तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष किशोर रायसाकडा मराठवाडा संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर. धुळे जिल्हाध्यक्ष जितेंद्र सिंग राजपूत संजय फुलसुंदर.. जिल्ह्यातील सर्व




जिल्हाध्यक्ष पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.... राज्य पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या कर्तुत्वान सन्मान भूमिपत्रांचा करण्यात आला यावेळी राजकीय सामाजिक शैक्षणिक पत्रकारिता क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राज्य पत्रकार संघाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.. १००० पत्रकारांना विमा. ट्रॅक सूट घड्याळ व विविध साहित्याचे वितरण करण्यात आले.

पाचोरा येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या खानदेश विभागातर्फे पाचोरा शहरात स्वामी लॉन्स येथे २९ ऑगस्ट रोजी विभागीय अधिवेशन संपन्न झाले.

राज्य पत्रकार संघाचे विभागीय अधिवेशन पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्र्वासराव आरोटे यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन संपन्न झाले यावेळी महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष,प्रविण सपकाळे,विभागीय अध्यक्ष किशोर रायसाकडा,कार्याध्यक्ष अबरार मिर्झा, उपाध्यक्ष भुवनेश दुसाने, उपाध्यक्ष । पान २ वर



# संपादकीय

## समाजाच्या हिताचे नाही..

अनेक कुटुंबे न्यायालयाची पायरी चढतात. २०२१ ते २०२३ या तीन वर्षांत राज्यात दरवर्षी सुमारे ३८ हजार खटले दाखल झाले. केंद्रीय विधी व न्याय खात्याने ही आकडेवारी माध्यमात जाहीर केली आहे. हा चिंतेचा विषय आहे. अनेक कुटुंबे मिळून समाज तयार होतो. परिणामी समस्येची कारणे शोधून त्यावर उपाय योजणे ही जाणत्यांची आणि ते उपाय अमलात आणणे ही लोकांची जबाबदारी आहे. याबाबतीत जाणत्यांचे निरीक्षण काय सांगते? नव्या पिढीत संयम कमी होत आहे. स्वातंत्र्य आणि समानतेचा चुकीचा अर्थ लावला जातो असे मत नागपूर कुटुंब न्यायालयातील ज्येष्ठ वकील रेखा बारहाते व्यक्त करतात. परस्पर सामंजस्य आणि सन्मान जपला तर वाद कमी होतील, असेही त्या म्हणाल्या. या उणिवा दूर करण्याची निकड सर्वांना सारखीच जाणवण्याची गरज आहे. याचाच परिणाम समाजस्वास्थ्यावर देखील होतो. समाजात बालगुन्हेगारी वाढत आहे. अडनिड्या वयाच्या मुलांचा सामाजिक गुन्ह्यात सहभाग आढळतो. पाचवीतील मुलाने दप्तरात पिस्तूल आणले आणि मित्राला गोळी घालून ठार केल्याची घटना नुकतीच बिहारमध्ये घडली. उद्ध्वस्त होत चाललेली कुटुंबव्यवस्था हे या समस्यांचे मूळ आहे. ज्याचे भयंकर परिणाम समाज अनुभवत आहे. काळानुसार जगण्याच्या पध्दतीत बदल अपरिहार्य आहेत. संयुक्त कुटुंबपध्दती छोटी होणे हे त्याचे चपखल उदहारण. त्याचे औचित्य पटवणारी कारणेही सांगितली जाऊ शकतात. तथापि त्याचा अर्थ मूल्ये बदलणे असा होऊ शकेल का? संयुक्त कुटुंबात भावभावनांचा निचरा घरातच होऊ शकायचा. अशी घरे सर्वांसाठी मूल्यांची शाळा होते. मोठी माणसे संयम, सहनशीलता, प्रसंगी मौन पाळणे याचा पुरस्कार करायची. तर छोट्यांवर संस्कार आणि मूल्ये रुजवली जायची. मुलांचे ऐकून घेणारे हक्काचे कान घरातच होते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा या भावनिक गरजांची पूर्तता आपोआपच व्हायची. चित्र फक्त छानच नसायचे. वाद, ताणतणाव आणि भांडणेही होती. तथापि ती संपवण्याचा विवेक काही जणांकडे तरी असायचा. तथापि कुटुंबे छोटी होताना या सगळ्या गोष्टींना पर्यायी व्यवस्था उभी करण्याच्या जबाबदाऱ्यांचा मात्र विसर पडला असावा का? त्याची जाणीव समाजाला सातत्याने करून देण्याची जबाबदारी जाणत्यांची आहे. कारण स्वस्थ कुटुंबातूनच उत्तम मुले म्हणजेच उत्तम माणूस घडतो. कोणत्याही कारणांवरून ती प्रक्रिया थांबणे समाजाच्या हिताचे नाही हेच आकडेवारी दर्शवते.

# अक्कलकोटच्या क्षितिजावरील बहुआयामी व्यक्तिमत्व: श्री अमोलराजे भोसले..

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

जिवनामध्ये कोणाबद्दल काहीतरी लिहावं म्हटलं तर शब्द हे सहजासहजी सुचत नसतात. प्रयत्नांची पराकाष्टा केल्यानंतर देखील ठराविक शब्दांपलीकडे काही सुचत नाही. शब्दांना तेव्हाच पान्हा फुटतो जेव्हा समोरील व्यक्ती ही साऱ्या जगाच दुःख आपल्या हृदयामध्ये सामावून घेऊन लोकसेवा करत असते. असं जनसेवेला वाहिलेलं व्यक्तिमत्व म्हणजे तुमचं आमचं सर्वांचं लाडक राज श्री अमोल राजे. तसं पाहिलं तर श्री अमोल राजे व माझी भेट प्रत्यक्षात समोरासमोर असं कधी आज पर्यंत झालीच नाही. तरी देखील मी त्यांच्यावरती लिहितोय याच एकच कारण त्यांचे व्यक्तिमत्व हे जनसेवेला संपूर्णपणे वाहून घेतलेल आहे.

ब्रह्मांडनायक श्री.स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने आणि वास्तव्याने पतितपावन झालेल्या कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेवर वसलेल्या अक्कलकोट तालुका व आसपासच्या परिसरामध्ये मराठी भाषा ,परंपरा व संस्कृती टिकवण्यामध्ये ज्यांचा मोठा वाटा आहे. असे जनसेवेचा उपजत वसा आणि वारसा लाभलेले ध्येयवेडे लोकसेवक , असंख्य कार्यकर्त्यांच्या गराड्यात वावरणारे आपल्या तालुक्यातील रयतेचे खरे राजे म्हणजे श्री अमोलराजे जन्मेंजयराजे भोसले. श्री स्वामीसमर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्य हे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री जन्मेंजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्र्वस्त श्री अमोल राजे भोसले यांच्या देखरेखीखाली चालते.महाराष्ट्रसह देशभरातील असंख्य स्वामी भक्तांना अन्नदान हे दिवसातून दोन वेळा या मंडळाकडून करण्यात येते. देशभरातून येणाऱ्या स्वामी भक्तांची विश्रांतीची सोय ही भक्त निवासामध्ये अतिशय उत्तम प्रकारे करण्यात येते. श्री अमोल राजे यांचे कार्य हे समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातील वेगवेगळ्या जाती धर्मातील अडलेल्या नडलेल्या गोरगरीब रयतेला मदत करणारे आहे. त्यांनी कित्येक गोरगरीब रयतेच्या झोपडीत स्वाभिमानाची ज्योत पेटवली आहे .कित्येक नव तरुणांना दिशा देऊन त्यांना उभ केल आहे. कित्येका ना त्यांनी अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून कायमस्वरूपी रोजगार मिळवून दिलेला आहे.समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातील, प्रत्येक स्तरातील गुणीजनांची पारख करून ते त्यांना दरवर्षी गुरुपौर्णिमाला मान्यवरांच्या हस्ते गुणिजन गौरव पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची पोच पावती देतात ,त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य करतात .सन २०१९च्या काळामध्ये कोरोनाच्या महामारीने संपूर्ण जगाला गुडघ्यावर आणले होते .अशा काळामध्ये श्री अमोल राजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ,त्यांच्या ट्रस्टच्या माध्यमातून अन्नछत्र मंडळाच्या भक्त निवासमध्ये कोरोना विलगीकरण कक्ष स्थापन करून सरकारी आरोग्य यंत्रणे सोबत खांद्याला खांदा लावून त्यांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिले. संकट काळामध्ये सर्व रयतेला उभारी देण्याचे कार्य त्यांनी केलं. आपल्या तालुक्यातील तरुण होतकरू पैलवानांना सकस खुराक दर महिन्याला अमोल राजे भोसले यांच्या ट्रस्ट तर्फे दिला जातो. सिद्धाराम शंकर प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुक्यातील व आसपासच्या भागातील पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण घेणाऱ्या मुला मुलींना अन्नछत्र मंडळातर्फे दोन वेळेचे जेवण मोफत स्वरूपामध्ये अनेक वर्षे दिले जात. सदर जेवण अतिशय दर्जेदार व रुचकर आहे. याचा मी २०१०ते ११दरम्यानचा प्रत्यक्ष लाभार्थी आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या एसटी बससाठी सुसज्ज अशी पार्किंग व्यवस्था निर्माण केली आहे .एसटीच्या चालक वाहकांसाठी वातानुकलीत सुसज्य रेस्टरूमची व्यवस्था केली आहे .चालक वाहकांच्या जेवणासाठी स्वतंत्र राखीव टेबलाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व स्तरातील, सर्व क्षेत्रातील माणसांची आईच्या मायेने आपुलकीने काळजी घेणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व श्री अमोल राजे भोसले आहेत. प्रजेच्या मनातील भावभावना राजाला समजणं आवश्यक असतं ,तेव्हाच प्रजेच्या मनात राजा बद्दल आदरभाव निर्माण होतो. हा आदरभाव सर्वसामान्य रयतेच्या मनात श्री अमोल राजे यांच्या बद्दल आहे. राजासारखं मन आणि मनासारखा राजा हे अमोल राजे यांना तंतोतंत जुळून येतं.तालुक्यातील कोणत्याही महापुरुषांची जयंती असो, ती जयंती लोकप्रबोधनात्मक आणि थाटामाटात साजरी झाली पाहिजे असे त्यांचे मत असते. नव्हे ते त्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी होत असतात .शिवजयंतीला तर ते आपल्या स्वतःच्या मंडळासह इतर अनेक मंडळांच्या कार्यकर्त्यांना स्वखर्चाने चांगल्या प्रतीचे कपडे शिवून देत असतात. दरवर्षी गुरु पौर्णिमेला अक्कलकोट तालुका वाशीय जनतेला ते सांस्कृतिक मेजवानी देत असतात.त्या काळामध्ये ते महाराष्ट्र कर्नाटकातील नामवंत व्यक्तींची व्याख्याने, कीर्तन कीर्तनकारांची कीर्तने, वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गजांचे गीत, कला ,नृत्य गायन ,वक्तृत्व यासाठी प्रसिद्ध असलेल्यांची कलाकुसर सादर करायला लावून तालुकावाशीय जनतेचे मनसोक्त ज्ञानप्रबोधन करण्याचे काम ते करत असतात. यामध्ये सर्व स्तरातील अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा समावेश असतो. वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून ते तालुकावाशीय जनतेचे वैचारिक भरणपोषण सतत करत असतात.स्वामी महाराजांच्या दर्शनासाठी राज्य परराज्यातील महत्त्वाचे राजकारणी, अनेक नामवंत कलाकार ,खेळाडू पासून ते अनेक अधिकारी येतात. त्या सर्वांचे न चुकता अन्नक्षत्र मंडळातर्फे आदर सत्कार करत असतात.अमोल राजे यांचे दुसरं सर्वात महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे ते तालुक्यातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांशी समन्वय साधून असतात.दोघांनाही आपलंसं करून मार्गक्रमण करण्याची त्यांची कला खूप छान आहे .विरोधी पक्षाच्या नेत्यांचे मन न दुखावता ते सत्ताधारी आमदाराशी जवळीक साधून आपले वेगवेगळे कार्य ते करून घेत असतात. तालुक्यातील सत्ताधारी पक्षातील नेते व विरोधी पक्षातील नेते यांच्याशी समतोल राखून समाजकारण, धर्मकारण करण्याची महाराजांची खुबी वाखाणण्याजोगी आहे. सर्व नामवंत राजकारण्यांच्या गराड्यात राहून देखील राजकारणापासून अमोल राजे हे अलिप्त आहेत. ते धर्मकारण आणि समाजकारणास सर्वस्व वाहून घेतलेले आहेत. इतर सर्व जाती धर्मातील जनतेची मनोभावे सेवा करत असताना आपण मुळात ज्या समाजातून जन्माला आलो त्या समाजा बद्दल त्यांना खूप आत्मीयता आहे. नुकतीच सोलापूरला जी समाजाची शांतता रॅली निघाली, त्याचे अक्कलकोट तालुक्यातील संपूर्ण नियोजन हे श्री अमोल राजे भोसले यांनी केले.सर्व क्षेत्राला दिशा आणि ताकद देण्याचं एवढं मोठं व्यक्तिमत्व असलेले श्री अमोल राजे यांच्या मनाला मीपणाची भावना कधीच स्पर्श केली नाही. ते फक्त माणसांनाच उभारी देण्याचं, त्यांना आधार देण्याचं कार्य करतात असं नाही तर ते निसर्ग प्रेमी देखील आहेत आणि त्या प्रेमाच्या पोटीच अक्कलकोट सोलापूर रोडवर अजिंक्यतारा हॉटेलच्या आसपास रोड लगत सुंदर अशी वडाची झाडे लावली आहेत .त्यांचे पालनपोषण ते जिवापाड करतात. तसेच अक्कलकोट शहरातील श्री फत्तेसिंह क्रीडांगणामध्ये देखील चांगल्या प्रकारच्या झाडाची लागवड करून त्याची ते देखभाल करतात. ते अन्नछत्र परिसराला लागूनच गोपालन देखील करतात. अन्नछत्र परिसरामध्ये अतिशय सुंदर अशी शिवसृष्टी त्यांनी निर्माण केली आहे.नावाने अमोल असलेले हे राजे सर्वसामान्य रयतेसाठी मात्र खूपच अनमोल आहेत .अमोलराजे हे आपली मराठी भाषा, कला, क्रीडा, संस्कृती याबद्दल प्रचंड जिव्हाळा असलेले व्यक्तिमत्व आहेत. आपल्या भारतीय पारंपरिक खेळाचा देखील त्यांना खूप खूप अभिमान आहे. ते गुरुपौर्णिमेला , शिवजयंती, गणपती उत्सव मध्ये मोठ्या आनंदाने लेझीम खेळत असतात.मी कुठेतरी ऐकलं होतं अथवा वाचलं होतं की अपार लोकप्रियता लाभलेल्या नेत्यांचे, व्यक्तिमत्वाचे एक पाय हे लोकसमूहात आणि दुसरे पाय हे आकाशाकडे उंच झेपावलेले असते .तेव्हाच तो सर्वगुणसंपन्न लोकनेता बनू शकतो .त्याचे सर्वगुण संपन्न उदाहरण म्हणजे जनसामान्यांच्या काळजात घर करून राहिलेले आदर्श व्यक्तिमत्व श्री अमोल राजे. अक्कलकोट तालुक्यातील अठरापगड जाती बराबलुतेदार यांना सोबत घेऊन चालणार, सर्वसामान्यांच्या मनात ,काळजात घर केलेलं सर्वांचं लाडके व्यक्तिमत्व म्हणजेच श्री अमोल राजे. सर्व जाती धर्म पंथातील रयतेला आपलंसं वाटणार, उगवत्या सूर्याप्रमाणे कायम प्रसन्न, अल्हाददायक व पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे शितल असलेल व्यक्तिमत्व म्हणजे श्री अमोल राजे .आपण स्वतः मोठे होत असताना आपल्या अवतीभोवतीची माणसं देखील मोठी झाली पाहिजेत यासाठी सर्वांना प्रगतीच्या वाटेने घेऊन जाणारे व्यक्तिमत्व म्हणजेच अमोलराजे. सतत असंख्य कार्यकर्त्यांच्या ,स्वामी सेवेकऱ्याच्या आणि स्वामी भक्तांच्या गराड्यामध्ये असलेले अतिशय उत्साही ,लोकप्रिय व्यक्तिमत्व .त्यांच्या सामाजिक धार्मिक कार्याची दखल घेऊन स्टेट इनोवेशन अँड रिसर्च फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील मानाचा 'सर सन्मान' पुरस्कार नुकताच श्री अमोल राजे भोसले यांना जाहीर झाला आहे .यापूर्वी देखील त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा सुवासिक सुगंध संपूर्ण महाराष्ट्रभर नव्हे तर संपूर्ण देशभर पसरत आहे .आभाळा एवढं अथांग, विशाल असलेले आपले हे व्यक्तिमत्व सदोदित निर्मळ वाहणाऱ्या झऱ्यासारखं सतत वाहत राहू दे..आणि आपल्या हातून लोकसेवेचे,समाजसेवेचे हे कार्य सतत चालत राहूदे ही सदिच्छा...



**शब्दांकन**
**श्री.मारुती देविदास शिंदे...**
**वागदरी ता. अक्कलकोट**

पान १ वरुन

## वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचे

अधिकारी भानुदास पालवे, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे आदी यावेळी उपस्थित होते.

मराठी भाषेतून संवाद साधत भाषणाची सुरुवात

सर्व लाडक्या बहिणी व भावांना तुमच्या या सेवकाचा नमस्कार, अशा शब्दांत मराठी भाषेतून संवाद साधत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वंदन करून भाषणाची सुरूवात केली.

सिंधुदुर्ग येथील घटनेबद्दल छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणाशी मस्तक टेकून मी माफी मागतो, असे सांगून प्रधानमंत्री पदासाठी नाव घोषित झाल्यानंतर मी सर्व प्रथम रायगड येथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीवर जाऊन प्रार्थना केली होती. भक्तिभावाने आशिर्वाद घेऊन राष्ट्रसेवेला प्रारंभ केला. छत्रपती शिवाजी महाराज हे माझ्यासाठी व माझ्या सहकाऱ्यांसाठी आराध्य दैवत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.आजचा दिवस हा विकसित महाराष्ट्र विकसित भारत संकल्पनेसाठी महत्त्वाचा दिवस आहे. राज्याच्या विकास यात्रेतील हा एक ऐतिहासिक दिवस असल्याचे सांगून श्री. मोदी म्हणाले की, महाराष्ट्राला एक समृद्ध व संसाधनयुक्त समुद्रकिनारा लाभला आहे. या समुद्र किनाऱ्यावरून आंतरराष्ट्रीय व्यापार होत असून यामुळे भविष्यातही मोठ्या संधी निर्माण होणार आहे. त्यामुळेच ७६,२०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाचा, देशातील सर्वात मोठे बंदर वाढवणमध्ये उभारण्याचा निर्णय घेतला आहे. देशभरातील सर्वच बंदरामधून जेवढी कंटेनर वाहतूक होते, त्यापेक्षाही जास्त कंटेनर वाहतूक एकट्या वाढवण बंदरातून होणार आहे. हे बंदर देशाच्या व्यापार व औद्योगिक प्रगतीचे मोठे केंद्र बनणार आहे. वाढवण बंदरामुळे या परिसराचा चेहरामोहरा बदलणार असून एक नवी ओळख निर्माण होईल. तसेच हा परिसर वेस्टर्न फ्रेट कॉरिडॉर, दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर यांना जोडला जाणार आहे. यामुळे वाढवण बंदरात वर्षभर कंटेनरची वाहतूक होणार आहे. या क्षेत्राची ओळख पूर्वी किल्ल्यांमुळे होत होती आता ही ओळख आधुनिक पोर्टमुळे होणार आहे.

वाढवण बंदरामुळे १२ लाख रोजगार निर्माण होणार

मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत या संकल्पनांचा लाभ महाराष्ट्राला होत असून यामध्ये महाराष्ट्राचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. वाढवण बंदरामुळे लाखो रुपयांची गुंतवणूक या परिसरात होणार असून सुमारे १२ लाख रोजगार निर्माण होणार आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्र सरकारने नेहमीच मोठे निर्णय घेतले. महाराष्ट्राचा विकास ही माझ्यासाठी सर्वात प्राधान्याची गोष्ट आहे. त्यामुळेच नुकतेच आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात दिघी येथे बंदर औद्योगिक क्षेत्राला मंजुरी दिली आहे. ही महाराष्ट्रातील नागरिकांसाठी आनंद द्विगुणित करणारी गोष्ट आहे. दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्र हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वप्नाचे प्रतिक बनेल. या पोर्टमुळे पर्यटन व इको रिसोर्टला चालना मिळेल, असेही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी यावेळी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांमुळे सागरी ताकदीला वेगळी ओळख

मच्छिमार बांधवांसाठी आज ७०० कोटीहून अधिक योजनांचा शुभारंभ केला आहे. तसेच वाढवण बंदर, दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, विविध मत्स्य व्यवसायाच्या योजनांचा शुभारंभ ही मोठमोठी कामे माता महालक्ष्मी, माता जिजाऊ, माता जीवदानी व भगवान तुंगारेश्र्वर यांच्या आशिर्वादने होत आहेत, असेही प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी, सागरी ताकदीला एक वेगळी ओळख दिली. सरखेल कान्होजी आंग्रे यांनी ईस्ट इंडिया कंपनीला धडकी भरवली होती. त्यांच्या या वारसाकडे नंतरच्या काळात लक्ष दिले गेले नाही. पण आजचा भारत हा नवीन भारत आहे. नवीन भारत देशात अनेक बदल घडवीत आहे. नवीन भारत आपल्या सामर्थ्याला व गौरवांना ओळखतो. सागरी क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करत आहोत. देशातच जहाज निर्मिती होण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न केले. त्यातून या क्षेत्रात कोट्यवधींची गुंतवणूक करत आहोत. यामुळे जहाज वाहतुकीचा वेळ कमी होत असून याचा फायदा व्यापारी व उद्योगांना होत असून तरुणांना नवी संधी मिळत आहे. देशातील बंदरांची क्षमता दुप्पट झाली आहे, असेही त्यांनी सांगितले.भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मत्स्य उत्पादन करणार देश झाला असून मत्स्य उत्पादनातही गेल्या नऊ वर्षात दुप्पट वाढ झाली आहे. झिंगा निर्यातही दुप्पट झाली आहे. मत्स्य उत्पादन क्षेत्रात महिलांचे योगदान वाढविण्यात केंद्र सरकार अग्रेसर असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

देशाच्या विकासात आदिवासी व मच्छिमार बांधवांचे योगदान मोठे आहे. सागरी क्षेत्रातील विकासात मच्छिमार बांधवांचे योगदान आहे. ५२६ गावे, कोळीवाडे आणि १५ लाख मच्छिमारांच्या लोकसंख्येसह महाराष्ट्राचे मत्स्यपालन क्षेत्रातील योगदान खूप मोठे आहे. त्यामुळेच आमच्या सरकारने आदिवासी तसेच मच्छिमारांसाठी वेगळे मंत्रालय निर्माण केले आहे. मच्छिमार बांधवांचे जीवनमान सुधारण्याला प्राधान्य दिले असून त्यांच्या हितासाठी योजना बनविण्यात येत आहेत. मच्छिमार बांधवांचे सामर्थ्य वाढविण्यासाठी मच्छिमार संस्था मजबूत करत असल्याचेही त्यांनी सांगितले. आज शुभारंभ केलेल्या मत्स्य व्यवसाय विभागाच्या योजना तसेच प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमुळे मच्छिमार बांधवांचे जीवनमान सुधारून आर्थिक संपन्नता येणार आहे. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे

डॉ. प्रा. विजय गाडे संपर्कप्रमुख,राकेश सुतार,ग्रा. जिल्हाध्यक्ष नागराज पाटील .... जळगाव जिल्हा अध्यक्ष भूषण महाजन रावेर जिल्हाध्यक्ष नवले.जिल्हापाध्यक्ष. नंदकुमार शेलकर, जिल्हा संघटक महेंद्र सूर्यवंशी,पाचोरा ता. अध्यक्ष प्रवीण ब्राह्मणे,भडगाव ता. अध्यक्ष अशोक परदेशी,चाळीसगाव ता.अध्यक्ष गफ्फार मलिक,अंमळनेर ता. अध्यक्ष समाधान मैराळे,भगवान मराठे,गणेश रावळ, आदि मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली,या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र भरातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली असून पाचोरा भडगाव अमळनेर तालुक्यातील १९ मान्यवरांना विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले, पाचोरा तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक शांताराम सोनजी पाटील यांना जिवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले,पाचोरा भडगाव विधानसभा चे आमदार किशोर अप्पा पाटील यांना विधानसभा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित तर शांताराम चौधरी, यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात आले,यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खानदेश विभागीय अधिवेशनासाठी पाचोरा येथे आलेल्या पत्रकारांना मोफत ट्रॅक सूट, घड्याळ,व विमा,वितरण करण्यात आले.तर विभागीय अध्यक्ष किशोर रायसाकडा यांच्या संकल्पनेतून यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी ७०पत्रकारांनी रक्तदान केले!

कार्यक्रमाच्या शेवटी, पत्रकार संघाने दिवंगत पत्रकार प्रमोद सोनवणे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत म्हणून पत्रकार संघाकडून ११ लाख रुपयांचे विमा कवच तसेच पत्रकार संघाकडून ५१ हजार रुपये आर्थिक सहाय्य प्रदान केले. यासोबतच, आमदार किशोर पाटील यांनी देखील ५१ हजार रुपयांची मदत केली. दिवंगत प्रमोद सोनवणे यांच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी पत्रकार संघाने घेतली आहे. राज्य सरचिटणीस डॉ. विश्र्वासराव आरोटे आणि किशोर रायसाकडा यांनी ही घोषणा केली. हा क्षण उपस्थितांच्या मनात खोलवर ठसला.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाद्वारे आयोजित केलेल्या अधिवेशनाला खांदेश विभागा तील असंख्य पत्रकार बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाला खान्देश विभागीय अध्यक्ष किशोर रायसाकडा, उपाध्यक्ष भुवणेश दुसाने,कार्याध्यक्ष अबरार मिर्झा, संपर्काप्रमुख. राकेश सुतार,पाचोरा ता. अध्यक्ष प्रवीण ब्राह्मणे,शहराध्यक्ष. राजेंद्र खैरनार, उपाध्यक्ष स्वप्निल कुमावत, इलेक्ट्रॉनिक मीडिया तालुकाध्यक्ष गजानन लाधे, भालचंद्र राजपूत भडगाव पत्रकार हल्ला कुर्ती समिती शहराध्यक्ष मुझम्मील शेख, चेतन महाजन,अलीम शाह, कसोद्याचे.सागर शेलार, यशस्वी करण्यासाठी यांनी परिश्रम घेतले तर नामांकित विधीतज्ञ कविताताई मासरे (रायसाकडा) यांनी मोठे योगदान संघटनेला दिले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# प्रेम प्रकरणातून मुलीच्या भावाने अक्षयला धमकावला आणि अक्षयचा चक्क कायमचा काटाच काढला

## नळदुर्ग तालुका तुळजापूर येथील घटना आरोपी मात्र मोकाट ॲट्रॉसिटी दाखल

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :नळदुर्ग येथील अक्षय बाळू सुरवसे हे युवक अशक्तपणा आल्याने नळदुर्ग येथील धन्वंतरी क्लिनिक येथे सलाईन लावून घेण्यासाठी गेलेला होता परंतु अक्षयची प्रेमिका तेथील धन्वंतरी क्लिनिक मध्ये नर्स म्हणून काम करत आसल्याने मनीषा राठोड हिने अक्षयला सलाईन लावली गेली नंतर ती सलाईन संपल्या नंतर अचानक पणे अक्षय बेशुद्ध पडला आणि त्याच्या तोंडातून फेस येऊ लागला तेव्हा अक्षयचा फोन घेऊन नर्स मनिषा राठोड अक्षयचे मित्र राजेश बनसोडे सुरज सुरवसे याना फोन करून बोलावून घेतले तेव्हा धन्वंतरी क्लिनिक मधुन हलविण्यात आले व डॉ पाटील क्लिनिक मध्ये दाखल केले डॉ जितेंद्र पाटील




यांनी जलद सोलापूरला जाण्यास सांगीतल्याने संबंधीत पेशंटची तब्येत खुप बिघडली आहे त्या साठी लवकरात लवकर सोलापूर छत्रपती शिवाजी महाराज स्वरूपच्या रुग्णालय येथे दाखल करण्यात आले त्यानंतर येथील डॉक्टरने अक्षयला मयत घोषित केल्याने तात्काळ संबंधितांच्या विरोधी सोलापूर येथे एम एल सी पोलीस किस करून संबंधित मनीषा राठोड तिचा भाऊ संदीप राठोड सुशील राठोड हे सर्व राहणार वसंत नगर नळदुर्ग येथील असून संदीप राठोड व सुशील राठोड याने गेल्या आठ दिवसाच्या अगोदर अक्षयला तू माझ्या बहिणीचा नाद सोड नाहीतर तुला संपावतो अशा प्रकारची धमकी दिली होती ज्या पद्धतीने धमकी दिली त्याच पद्धतीने फक्त केवळ आठ दिवसांमध्ये अक्षय ला सलाईन लावणे अर्धी सलाईन झाल्याच्या नंतर तिला बेशुद्ध होणे हा प्रकार खूप भयानक वाटला याबद्दल संशयित म्हणून डॉ बालाजी जाधव यांचे नाव असून वरील आरोपी तात्काळ अटक करावी म्हणून संबंधित अक्षय बाळू सुरवसे यांची प्रेत घेऊन बाजारपेठेतून पोलीस स्टेशन कडे रवाना झाले संबंधित पोलिस ठाणे नळदुर्ग येथे गेट समोर प्रेस ची गाडी उभा करून संबंधितावर गुन्हा नोंद करावा अन्यथा तात्काळ अटक करावी यासाठी सर्व समाज बांधवांनी जोर धरला पोलिसांकडून आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ करण्यात आली नंतर संबंधित पोलीस उपविभागीय अधिकारी निलेश देशमुख यांच्याशी संपर्क साधून त्यांना तात्काळ नळदुर्ग येथे बोलविण्यात आले त्यानंतर निलेश देशमुख पोलीस निरीक्षक गजेंद्र भानुदासराव सरोदे संबंधित आरोपी मनीषा राठोड संदीप राठोड आणि सुशील राठोड यांच्या विरुद्ध कलम १०५ , ३५१ ( २ ) ३ ( २ ) ३ ( २ ) ( तर ) अनु जाती प्रतिबंध कायदयानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आसुन तेथील धन्वंतरी क्लिनिकचे डॉ बालाजी जाधव हे संशयित आरोपी म्हणून आसणार आहेत वरील सर्व आरोपी सध्या मोकाट असून त्यांचा तपास काही लागत नसल्याने नागरिकात संतापाची लाट येत आहे

सदरील आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी आणि अक्षयला न्याय मिळावा यासाठी परत एक सिस्टमंडळ संबंधित तुळजापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी निलेश देशमुख यांना भेटणार आसल्याचे बोबले जात आहे . पुढील तपास तुळजापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख हे करत आहेत

# टाकळीवाडी मध्ये पाटील पोल्ट्री फार्म उद्घाटन मोठ्या उत्साहात




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधीः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील फेडरल बँक माजी कॅशियर संजय पाटील यांच्या पाटील फार्म उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साह संपन्न झाला. फित कापणेउद्घाटन टाकळीवाडीच्या सरपंच यांच्या हस्ते झाले. तसेच नामकरण फलकाचे उद्घाटन फेडरल बँक शिरोळ चे शाखाधिकारी महेश निकम, फेडरल बँक कुरुंदवाड शाखाधिकारी दिपकसिंग नेगी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी टाकळीवाडी गावातील वसंत गोरे, बापू कोळी, बजरंग गोरे,रमेश बिरणगे, महादेव गोरे,राजू जूगळे, राम गायकवाड, राजू निर्मळे तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते.

# मनसे सन्मान... ऑलिंपिक पदक विजेता



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :मनसे ओलंपिक पदक विजेता.... नुकत्याच झालेल्या पॅरिस येथील ऑलिंपिक मध्ये कुस्ती स्पर्धेत ५७ किलो वजन गटात कास्य पदक मिळवलेल्या अमन शरावत यांनी महाराष्ट्र नवनिर्माण ण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांची मुंबई येथील शिवतीर्थ निवासस्थानी भेट घेऊन आशीर्वाद घेतली.

यावेळी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, सर्वोच्च न्यायालयातील वकील उद्योजक हर्षद दहिया, व कोच प्रदीप कुमार सागर शेरावत इत्यादी उपस्थित होते

# कर्मयोगी इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे नामांकित कंपनीत निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयातील पंढरपूर दोन मेकॅनिकल इंजिनिअर विभागातील विद्यार्थ्यांची असे एकूण नऊ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी दिली आहे पुणे येथील अमेरिकन अँड तेलुगु कम्युनिकेशन विभागातील सुरज गायकवाड आणि निकिता मिरसाळे या विद्यार्थ्यांची निवड केली आहे तसेच कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग विभागातील रिया वळसंगे या विद्यार्थिनीची टीसीएम या कंपनीमध्ये तर पंकज जाधव यांची आयएस एम सोल्युशन या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रसाद कुलकर्णी सागर जानकर सुनील शेळके संतोष वाघमोडे गोपाल बॉयलवार या विद्यार्थ्यांची थेट जेटेक या नामाची कंपनीमध्ये निवड झाली आहे सर्व कंपन्या अभियांत्रिकी क्षेत्रातील असल्या कंपन्या आहेत दरवर्षी प्रमाणेच कर्मयोगीने याही वर्षी जेसमेंट क्षेत्रामध्ये आपले प्रभुत्व कायम ठेवले आहे अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण होण्याआधीच विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड होताना दिसून येत आहे




त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या आणि महाविद्यालयाच्या दृष्टीने ही अत्यंत अभिमानाची बाब आहे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट या विभागातील दिले जाणारे प्रशिक्षण हे कार्पोरेट क्षेत्रात नोकरी लागण्यासाठी अतिशय पूरक व उपयोगी होत आहे असे निवड झालेल्या विद्यार्थी आवर्जून सांगतात की पांढरा प्रतिष्ठानचे विश्र्वस्त श्री रोहन परिचारक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टर श्री जी डी वाळके उपप्राचार्य राजे सुजेगावकर ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर मोहन सिंह शेख संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद शैक्षणिक अधिका प्राध्यापक आशिष जोशी विभाग प्रमुख प्राध्यापक अनिल बाबर डॉक्टर एस व्ही एकलारकर प्राध्यापक दीपक भोसले प्रा एस एम लंबे अभिनंदन देशमाने तसे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समन्वयक प्राध्यापक सुधीर कुलकर्णी प्राध्यापक दत्तात्रय चौगुले प्राध्यापक जगताप्रा योगेश माने इतर सर्व प्राध्यापक यांची निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# तमाम ओबीसी व्हीजेएनटी,एसबीसी समाजाची तातडीची बैठक

**लातुर जिल्ह्यातील सर्व ओबीसी, व्ही जे एन टी, एस बी सी संघटना तसेच यामध्ये समाविष्ट जाती संघटनाना विनम्र आवाहन**

**दैनिक यशसिद्धी न्युज**

औसा/अमर जाधव : सरकार ओबीसींच्या अनेक गंभीर प्रश्नांकडे कानाडोळा करीत आहे.तसेच ओबीसी आरक्षणामधे सरकार पुरस्कृत खुसखोरी केली जात आहे .गेली अनेक वर्षे जातनिहाय जनगणनेची मागणी आपण करीत आहोत. परंतु, ओबीसी समाजाच्या मागण्याना कचऱ्याच्या डब्यात फेकले जात आहे.वरील सर्व ओबीसींच्या हिताच्या प्रश्नावर सरकारला जाब विचारन्यासाठी ओबीसींचा भव्य महायल्गार मेळावा औसा येथे आयोजीत करायचा असुन त्यासंदर्भात औसा येथे नियोजनाच्या बैठका पार पडलेल्या आहेत आता यापुढे जिल्हास्तरीय बैठक रविवार दिनांक१/९/२०२४ रोजी सकाळी दहा वाजता.हॉटेल मयुरा अंबाजोगाई रोड लातुर

या ठीकाणी बैठकीचे आयोजन केलेले असुन जिल्यातील सर्व ओबीसी संघटनांच्या पदाधिकार्यांनी ओबीसींचा आवाज बुलंद करन्यासाठी सदरील बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थीत रहावे रविवार, दि. १ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ठीक १० वाजता. ठिकाण : हॉटेल 'मयुरा' अंबाजोगाई रोड लातुर, जिल्ह्यातील सर्व ओबीसी संघटना तसेच ओबीसीमध्ये समाविष्ट जाती संघटनांची संयुक्त बैठक आयोजित केली आहे. तरी ओबीसी संघटनांच्या , राजकीय पक्षांच्या ओबीसी सेल व ओबीसीतील जात संघटना च्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी बैठकीला उपस्थित राहावे.

# मैंदर्गी मुली शाळेचे पालकांना घेऊन देवदर्शनला; मैंदर्गी गावातील कन्नड मुली शाळेचे एक अनोखा उपक्रम

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यातील मैंदर्गी कन्नड मुली शाळा येथील शाळेचा उपस्थित पटसंख्या गुणवत्ता वाडीसह व जिल्हा परिषद शाळेकडे पालकांचेओढ निर्माण होण्यासाठी एक अनोखा उपक्रम केला आहे या शाळेने वेगवेगळे उपक्रम शाळेत राबवत असतात परिसर भेट साखर कारखाना भेट वनभोजन पालकांचे सहकार्याने वृक्षारोपण आषाढी एकादशी दिंडी प्रभात फेरी मध्ये घोडा गाडी ग्रंथ दिंडी या सर्व कार्यक्रमात पालकांचे सहभाग करून घेत असतात विशेष म्हणजे शाळा कडून दोन वेळा विमान प्रवास केले आहे गोरगरिबांच्या मुलींना शेतकऱ्यांच्या मुलींना विमान प्रवास घडविणे हा सोपं काम नाही हे सर्व काम करून अजून एक नवीन उपक्रम केले आहे ते म्हणजे शाळेतील मुलींचे पालक यांना श्रावण महिन्यात श्रीशैलम मंत्रालय महानंदी या देवी देवतांचे दर्शन मोफत शाळेचे वतीने करण्यात आले या प्रवासात पालक लोक बहुसंख्येने उपस्थित होते हे सर्व शाळा कडून करण्याचे उद्देश फक्त शाळेचे गुणवत्ता विद्यार्थ्यांचे गुणवत्ता व पट आणि



उपस्थिती वाढवणे या उद्देश डोळ्यासमोर ठेवून पालकांचा देवदर्शनाचा उपक्रम घडविले आहे या देवदर्शन कार्यक्रमात सहभागी झालेले पालक आनंदी व उत्साही होते चार दिवसाचे देवदर्शनाचे सहल जिल्हा परिषद कन्नड मुली शाळेचे वतीने मुख्याध्यापक श्री महांतेश्र्वर हनमंतराव कट्टीमनी तसेच शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष सागर गोब्बुर व सर्व सदस्य यांचे नियोजनामुळे घडले आहे अतिउत्साही पालक शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांचा आभार मानले

पुढे शाळेला कुठल्याही गरज पडलेत तर आम्ही सामूहिक रीतीने सहकार्य करणार असे सांगितले

# ईटकूरचे बिट अंमलदार पोपट जाधव यांचा सत्कार

**दैनिक यशसिद्धी न्युज**

कळंब/सुधाकर रणदिवे : कळंब पोलिस स्टेशनचे पोलिस हवलदार तथा ईटकूर बिटचे बिट अंमलदार पोपट जाधव यांची बदली झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ देवून यथोचित सत्कार करण्यात आला.

कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस हवलदार पोपट जाधव हे येथे मागील चार वर्षांपासून ईटकुर येथे बिट अंमलदार म्हणून कार्यरत होते त्यांच्या कार्यकाळात तंटामुक्तीच्या माध्यमातून गावातील तंटे गावातच मिटवून तंटामुक्त गाव ठेवण्यासाठी तसेच सार्वजनिक उत्सवामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत विना तंटे उत्सव साजरे करण्यासाठी भर दिला जात होता. त्यांच्या कार्यकाळात एक ही क्रिटीकल गुन्ह्याची नोंद झाली नाही हे एक वैशिष्ट्य. गावा गावातील एकोपा अबाधित ठेवण्यासाठी गावातील तंटे गावातच मिटविण्यासाठी सतत



प्रयत्नशील असत. त्यांच्या या कार्याची दखल घेत पोलिस प्रशासनाने पोलिस नाईक पदावरून त्यांची पोलिस हवलदार पदी बढती केली. परंतू त्याची प्रशासकीय बदली मध्ये बेंबळी पोलिस स्टेशनला बदली झाल्याने व ईटकूर येथे चार वर्षे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा शाल,श्रीफळ देवून सत्कार केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी ग्रा.प सदस्य गुंडेराव गंभीरे, तंटा मुक्तीचे अध्यक्ष भारत जाधव, अभयसिंह आडसुळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास पावले, आदर्श शिक्षक तुकाराम शिंदे,दत्तात्रय बावळे , प्रतीक आडसूळ, सचिन गंभीरे, रावसाहेब गंभीरे, पोलिस पाटील सोमनाथ जगताप, लक्ष्मण गंभीरे, विजय गाडे, महादेव सावंत, प्रकाश आडसुळ, तुषार बावळे, अमोल कांबळे, फिरोज मनीयार, राजकुमार आडसुळ, विलास माने, बाबासाहेब जगताप,पत्रकार अजित गायके, रामभाऊ गंभीरे, गंभीरवाडीचे उप सरपंच शिवाजी गोडगे, जीवन काळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी दोषीवर कायदेशिर कारवाई करण्याची मागणी

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर : मालवन मधील राजकोट किल्ल्यावर काही दिवसापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा बसतिला होता. निष्कृष्ट दर्जाचे पुतळयाचे काम झाल्यामुळे मुसळधार पाऊस, वादळवाऱ्यामुळे छापती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना मानणाऱ्या सर्वच शिवप्रेमीचा व समस्त महाराष्ट्रीयनच्या मनाते संतापाची लाट पसरली आहे.तसेच, महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली आहे. पुतळा बसविण्यासाठी



सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता स्ट्रक्टचर ऑडीडर, पुतळयाचे शिल्पकार, पुतळा देखरेख करण्यासाठी नेमण्यात आलेली समिती यांनी पुतळयाकडे जाणूनबुजून पैसे खाण्याच्या हव्यासापोटी दुर्लक्ष केले. त्यामुळे पुतळ्याचे काम अतिशय निष्कृष्ट व दर्जाहीन झाले, त्यामुळे वर्षभराच्या आतच पुतळ्य कोसळला आहे. त्यामुळे वरील सर्व संबंधित दोषीवर कडक कारवाई करुन करुन त्यांना शासन सेवेतून बडतर्फ करण्यात यावे व त्यांनी कमाविलेली मालमत्ता जप्त करण्यात यावी, या मागणीचे निवेदन विकास इंडीया पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रवीण बुरुडे यांनी उपजिल्हाधिकारी लोखंडे साहेब यांना दिले. यावेळी अनिल साळवे शहराध्यक्ष मध्य राजेश लकडे राजेंद्र सोनवणे मारुती अन्नपूर्णे रामभाऊ आढाव शिवाजी आढाव शंकर आढाव अतुल जोशी नितीन जोशी उपस्थित होते.

# केंद्र सरकारकडून बी हेवी व ज्यूस पासून इथेनॉल उत्पादनावरील बंदी मागे : हर्षवर्धन पाटील

## ■ राष्ट्रीय साखर संघाच्या पाठपुराव्यास यश ■

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

इंदापूर/अतुल सोनकांबळे : केंद्र सरकारने बी हेवी व ज्यूस (ऊसाचा रस ) पासूनच्या इथेनॉल उत्पादनावरती दि.१५ डिसेंबर २३ रोजी घातलेला बंदी आदेश गुरुवार दि. २९ ऑगस्ट २४ पासून मागे घेतला आहे. सदरचा बंदी आदेश उठविणे संदर्भात राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या पाठपुराव्यास यश आले आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी गुरुवारी (दि.२९) दिली.



ते पुढे म्हणाले, देशामध्ये वापरासाठी साखरेची कमतरता भासू नये म्हणून केंद्र सरकारने १५ डिसेंबर २३ रोजी बी हेवी व उसापासून इथेनॉल निर्मितीवरती निर्बंध लागू केले होते. परिणामी, देशातील साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मितीसाठी केलेली ५० हजार कोटीची गुंतवणूक अडचणीत आली होती. त्यामुळे सदरची बंदी उठविणे संदर्भात गृह व सहकार मंत्री अमित शाह यांची राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने भेट घेऊन मागणी केली होती. या संदर्भात केंद्र सरकारकडे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघामार्फत सततचा पाठपुरावा सुरु होता. अखेर मागणीस यश येऊन केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालय, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग (साखर आणि वनस्पती तेल संचालनालय) कृषी भवन यांनी बंदी उठविण्याचा आदेश गुरुवार,दि. २९ ऑगस्ट २४ रोजी जारी केला आहे, अशी माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

केंद्र सरकारने बी हेवी व ज्यूस पासून इथेनॉल उत्पादनास घातलेल्या बंदीचा निर्णय मागे घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांचे राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी आभार व्यक्त केले. केंद्र सरकारने बंदी आदेश मागे घेतल्याने आगामी सन २०२४/२५ च्या ऊस गळीत हंगामामध्ये बी हेवी मॉलिसिस व ऊसाच्या रसापासून साखर कारखाने व डिस्टीलरी प्रकल्पामधून इथेनॉलची निर्मिती होणार आहे. त्यामुळे उत्पादित साखरेपेक्षा उत्पादित इथेनॉलला चांगला दर मिळणार आहे. या निर्णयाचा देशातील पाच कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे, असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

# विठ्ठल कारखान्याच्या निवडणुकीमध्ये भरभरून प्रेम दिले त्याच पद्धतीने येत्या विधानसभेला तुमचा आर्शीवाद सोबत असावा : अमर पाटील

✻ एकीकडे कारखान्याचे प्रश्न मार्गी लावत दुसरीकडे जनसंपर्क वाढवण्याच्या जोरावर अभिजीत पाटलाची विधानसभेची साखर पेरणी सुरू ✻ मेंढापूर येथील खेळ पैठणीच्या कार्यक्रमातून पैठणीच्या माता-माऊलींच्या चेहऱ्यावर फुलले हास्य आणि समाधान मोठ्या जल्लोषात महिलांनी लुटला आनंद

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.अभिजीत आबा पाटील यांच्या वतीने माता-भगिनींना स्वत:साठी वेळ देता यावा, मैत्रिणींच्या सहवासात त्यांना दोन क्षण स्वत:साठी जगता यावे, या हेतूने सुप्रसिद्ध निवेदिका मोनिका जाजू यांच्या उत्कृष्ट संयोजनातून 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन पंढरपूर तालुक्यातील मेंढापूर या ठिकाणी करण्यात आले होते. त्याला स्थानिक माता-भगिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला..

एकीकडे अभिजीत पाटील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या कर्ज प्रकरणाचा प्रश्न मार्गी लावत असताना दुसरीकडेच माढा मतदारसंघांमध्ये विठ्ठल कारखान्याच्या कार्यक्षेत्र असणाऱ्या ४२ गावांमध्ये मोठा जनसंपर्क वाढवण्याच्या वर विधानसभेची साखर पेरणी सुरू आहे.

रक्षाबंधन व नागपंचमीच्या निमित्ताने विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित अभिजीत पाटील यांनी माढा मतदारसंघांमध्ये अनेक ठिकाणी खेळ पैठणीचे मनोरंजन कार्यक्रम घेऊन घेत




असताना पंढरपूर तालुक्यातील मेंढापूर येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या सर्व माता-भगिनींच्या कुटुंबातील एक सदस्य, भाऊ आणि एक मुलगा म्हणून त्यांच्यासाठी कार्य करणे माझी जबाबदारी आहे. येत्या काळात त्यांच्यासाठी कार्य करण्याची ऊर्जा माय माऊलींच्या आशीर्वादातून नक्कीच मिळेल असे धाराशिव कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. यावेळी श्री विठ्ठल कारखान्याचे संचालक दिनकर चव्हाण, नवनाथ नाईकनवरे, सिद्धेश्र्वर बंडगर यांसह मेंढापूर येथील शरद पाटील, विपुल मखर, बाबासाहेब पवार, अमर पवार, तात्या पाटील, राहुल कदम, विशाल पवार, प्रवीण पवार, विकास मखर, आबासाहेब गवळी, संघर्ष पवार, युवराज गोरे, स्वप्नील पवार, शंकर थिटे, अमर पाटील, कुलदीप पाटोळे, ऋषिकेश नागणे, समाधान पवार, अविनाश गोरे, आबा सरवळे, सागर पवार, अतुल पवार, सुहास पवार, बालाजी पाटील, सारंग पाटील, एकनाथ कोरके, संभाजी चव्हाण तसेच समस्त ग्रामस्थ मेंढापूर येथील महेश पाटील, रायबा मस्के, गणेश शिंदे, हर्षद मोहिते, विशाल झेंडे, सागर झेंडे, किशोर मखर, शांताराम शेळके, रामभाऊ पाटोळे, सुजित पाटोळे, प्रवीण पाटील, ऋषिकेश मकर यासह अनेक ग्रामस्थसह महिला भगिंनी, नागरिक उपस्थित होते..

# सैनिक टाकळी चे राजेंद्र हरिबा घाटगे यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्ती दूत पुरस्कार जाहीर

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : कोल्हापूर समर्थ सोशल फाउंडेशन न्यू ट्रिपल हेल्थ प्रो.प्रा. लिमिटेड ही सामाजिक संस्था आणि शिवशंभू निवासी व्यसनमुक्ती केंद्र गेले २०१५ पासू म्हणूनन देशभर व्यसनमुक्ती मधुमेह मुक्ती रोगमुक्ती शिशु रक्षा व वेदना मुक्ती अशा महत्त्वाच्या व घरोघरी अत्यंत गरज असणाऱ्या विषयावर कार्य करत आहे संस्थेचे हे अभियान घरोघरी पोहोचवण्यासाठी संस्थेकडे प्रशिक्षित झ.ठ.जडॉक्टर्स सोशल वर्क शिक्षक विद्यार्थी रिटायर पर्सनल व गृहिणी आहेत यांच्या माध्यमातून लाखो लोकांच्या फायदा होत आहे



आपल्या संपर्कातील लोकांना त्यांच्या व्याधीतून बाहेर काढण्यासाठी योग्य उपचार आहार पथ्य तसेच व्यसन संदर्भात योग्य मार्गदर्शन करणे एक काम अहोरात्र ही सर्व लोक करत आहेत या कार्यामुळे अनेक कुटुंब नव संजीवनी मिळत आहे याची दखल घेऊन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्कृष्ट काम करणाऱ्यांना झ.ठ.जना संस्थेकडून राज्यस्तरीय व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्ती दूत पुरस्कार देऊन उचित सन्मान केला जाणार आहे यावर्षीही हजारो प्यारो म्हणून निवड करून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल संस्थेचे झठज राजेंद्र हरीबा घाटगे मु. पोस्ट सैनिक टाकळी. तालुका .शिरोळ जिल्हा. कोल्हापूर यांना हा पुरस्कार देण्यात आला

# युवा सेना दहीहंडी उत्सवात गोविंदाचा कसरती तर युवकांचा जल्लोष

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी:शेकडो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये साजरा झालेल्या पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील युवा सेना दहीहंडी उत्सवामध्ये गोविंदाच्या पथकाकडून थर रचण्यासाठी करण्यात आलेल्या कसरती आणि डीजे च्या गाण्यावर थीरकणाऱ्या युवकांच्या जल्लोषाने अनेकांच्या नयनांचे पारणे फिटले. युवासेना पंढरपूर तालुकाप्रमुख महादेव भोसले यांच्या संकल्पनेतून साकारलेला आणि महादेव काका भोसले मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला युवा सेना दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख शिवाजी बाबर, युवती सेनेच्या प्रियंका परांडे, उपशहर प्रमुख सनी असंगे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंढरपूर येथील संकल्प पथकाने पाच थरांची सलामी देऊन दहीहंडी उत्सवाची सुरुवात केली. त्यानंतर सात थरांची कसरत करण्यात आली. यावेळी या गोविंदांकडून थर रचण्यासाठी होणाऱ्या विश्र्वास, जिद्द, चिकाटी, साहस, चपळाई आदी गुणांचे कौतुक करून उपस्थितांनी जल्लोष आणि सहसाचा हा क्षण आपल्या नयनांमध्ये साठविला. तर सात थरांचा मनोरा रचत संकल्प पथकाने ही दहीहंडी फोडण्याचा मान मिळवत सोमनाथ शिवाजी लोखंडे यांनी ठेवलेले ३१ हजार रुपयांचे बक्षीस पटकावले.

पुणे मुंबई सारख्या शहरांमध्ये होणाऱ्या दहीहंडी सारखा थ्रील अनुभवण्यासाठी उपस्थित असलेली तरुणाई या दहीहंडी सोहळ्याप्रसंगी गोविंदा आला रे च्या जल्लोषात डीजेच्या गाण्यावर थीरकण्याचा मनमुराद आनंद घेतला. उपस्थित गोविंदा, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते, युवक वर्ग यांचे महादेव काका भोसले मित्र मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले.

**ग्रामीण भागातील दहीहंडी उत्सवाचे सर्वत्र कौतुक....**

मोठमोठ्या मेट्रो सिटी मध्ये होणारे



दहीहंडी उत्सव पाहून अशा उत्सवांमध्ये सहभागी होण्याचा मानस रोपळे सारख्या ग्रामीण भागातील या युवा सेना दहीहंडी उत्सवामुळे पूर्ण झाल्याने या दहीहंडी उत्सवाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नळदुर्ग नगर परिषदे समोर कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन आज संपाचा दुसरा दिवस

✻ नागरिकांच्या नगर परिषदे कडे फेऱ्या चालू
✻ बेमुदत संपामुळे नागरीकांची हेळसांड




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महाराष्ट्र राज्यभर नगरपालिका संवर्ग अधिकारी संघटनेने आपल्या विविध प्रलंबित मागण्यासाठी पुकारलेल्या बेमुदत बंद संप चालू आसुन या संपात नळदुर्ग नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी सहभागी होऊन बेमुदत संप चालू केला आहे . आज संपाचा दुसरा दिवस आहे या संपामुळे नळदुर्ग नगर परिषद कडे नागरिकांच्या फेऱ्या वाढत आहेत अनेक नागरीकांची कामे खोळंबलेली दिसून येतात हा संप तात्काळ मिटावा आणि नागरीकाची कामे तात्काळ करण्यात यावेत अशा प्रकारची मागणी नागरिकातून होत आहे

बेमुदत संपावर गेलेल्या कर्मचाऱ्यांनी नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांना मागणीचे निवेदन देण्यात आले असून या निवेदना मध्ये जुनी पेन्शन योजना मिळावे आश्र्वासीत प्रगती योजना लागू करावी , सहाय्यक अनुदान एक महिना आगाऊ देणे , सातवा आयोग व महागाई भत्ता फरक देणे , सफाई कामगारांना त्यांच्या हक्काचे व पक्के घर मिळावे कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे सर्वसाधारण बदल्यांमधील जाचक अटी रद्द करणे आदी प्रमुख मागण्या सह सर्व कर्मचारी ठिय्या मांडून नगर परिषदेसमोर बसलेले असून जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आम्ही बेमुदत संप करणार आहोत अशा प्रकारची मागणी आजही वरिष्ठांकडे होत आहे या संपा मध्ये अजय काकडे नगर अभियंता वैभव चिंचोले पाणीपुरवठा अभियंता दिक्षा सिरसट कार्यालयीन अधीक्षक दिपक कांबळे स्वच्छता विभागाचे खलील शेख ,संघटिका राणूबाई सपकाळ तानाजी गायकवाड दस्तगिर जहागीरदार , विठ्ठल खंदारे , ज्योती बचाटे , आनंद खारवे , आण्णाराव जाधव , भिमसेन भोसले , सुरज काळे , प्रविण चव्हाण, नितीन पवार , सतीश आखाडे , सुशांत भालेराव , नवनाथ होड्राव्ह , सुशांत बाबा डुकरे , शहाजी येडगे , फुलचंद सुरवसे , एम जी भुमकर , खंडु नागणे , चंद्रकांत जाधव , सुरेश भालेराव उपस्थित होते.

# शाखा व्यवस्थापक यांच्याशी चर्चा,बँकेच्या सुरळीत कामकाजबाबत समाधान व्यक्त केले

## स्टेट बँक ऑफ इंडिया महाराष्ट्र मंडळाचे मुख्य महाव्यवस्थापक अरविंद कुमार सिंह यांनी दिली भारतीय स्टेट बँकेला भेट

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी: भारतीय स्टेट बँक,शाखेची प्रगतीत दिवसेंदिवस वाढ होत असताना स्टेट बँक ऑफ इंडिया,महाराष्ट्र मंडळाचे मुख्य महाव्यवस्थापक अरविंद कुमार सिंह यांनी बॅंकेला भेट देऊन शाखा व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत बँकेतील उत्तम व्यवस्था व स्वच्छता पाहून समाधान व्यक्त केले.



अक्कलकोट येथील भारतीय स्टेट बँक शाखेला मंगळवारी नुकतेच अरविंद कुमार सिंह यांनी भेट दिली असता.अक्कलकोट शाखेचे व्यवस्थापक विकास खडतकर व सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी त्यांच्या समवेत बँकेचे उप महाव्यवस्थापक तथा कोल्हापूर प्रशासकीय कार्यालय प्रमुख पंकज कुमार बरनवाल,

उप महाव्यवस्थापक महाराष्ट्र मंडळचे कुमार परिमल प्रेम,सोलापुरचे छत्रीय व्यवस्थापक निशांत कुमार जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती मुख्य महाव्यवस्थापक अरविंद कुमार सिंह यांनी बँकेतील प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या ठिकाणी जाऊन कशा पद्धतीने कामकाज सुरू आहे.याची पहाणी केली आणि प्रत्येकाशी हितगुज करून अडी अडचणी जाणून घेतल्या.नेहमीप्रमाणे बँकेतील व्यवहार सुरळीत चालू असतांना खातेदारांची कोणतीच अडचणी दिसून आल्या नाही.पारदर्शक कामकाज पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. गेल्या काही महिन्यापासून एसबीआय बँकेमध्ये ग्राहकांना चांगली सेवा व सन्मानाची वागणूक दिली जात असल्याने खातेदाराची संख्या वाढली.बँकेत ग्राहकांची वाढती गर्दी पाहता कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर ताण तणाव जाणवत नाही.कर्मचाऱ्यांना काम करण्याची उर्जा मिळते.अलीकडच्या काळात बँकेची मजबूत स्थिती हे पेरणादायी ठरत असल्याचे खातेदारांनी सांगिले. यावेळी सहाय्यक प्रबंधक मनीष वानखेडे,सहाय्यक प्रबंधक धवल भजभुजे,फिल्ड ऑफिसर केदार चौगुले, वरिष्ठ सहयोगी मैलारी कुंभार,वरिष्ठ सहयोगी बसवेश्र्वर कुंभार,वरिष्ठ सहयोगी स्नेहल देशपांडे,कनिष्ठ सहयोगी आयुषी अग्रवाल,कनिष्ठ सहयोगी शुभम पिंपळकर, प्रभाकर कांबळे,नंदकुमार पाटील,अर्जुन बराडे, तुळशीदास जोगधनकर,रेवणसिद्ध हिरेमठ,राहुल दुलंगे,कलावती सूर्यवंशी आदी कर्मचारी उपस्थित होते.

# दुधनीचा गुरुशांत कोलाटी ग्रामसेवक म्हणून नेमणूक झाल्याने मित्र परिवाराकडून सत्कार

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

दुधानी /प्रतिनिधी :अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील एका गरीब कुटुंबात जन्म घेऊन अपार कष्ट मेहनत याच्या जोरावर शासनाने घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन ग्रामसेवक म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये त्याची नेमणूक झाली तो एस जी परमशेट्टी प्रशालेचा माजी विद्यार्थी आहे त्या पित्यार्थ दुधनी येथील गुरुशांत कोलाटी यांचे मित्र परिवाराकडून मोठ्या थाटामाटात शाल फेटा पुष्पहार अर्पण करून सत्कार करण्यात आले याप्रसंगी अभिषेक परमशेट्टी आकाश हौदे समीर जिडगे लक्ष्मीपुत्र मगी वीरेश येगदी महांतेश माळी मेराज जिडगे नागराज आत्ते शब्बीर शेखजी वीरेश पाटील रवी माळगे शांतलिंग गिन्नी इस्माईल गुलबर्गा मयूर हिबारे अशपाक मुजावर यांच्यासह अनेक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

